ISO 9001 : 2015
ISO 14001 : 2015
ISO 27001 : 2013
ISO 45001 : 2018

जनेप प्राधिकरण
JNPA

# जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण
# JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई - 400707. Port Office : Administration Bldg., Sheva Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 : मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 :
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191 : मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 :
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081 : मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171 : हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • Email : info@jnport.gov.in

क्रमांक: जेएनपीए/ वाढवण/२०२४/ १३९४ तारीख: २४/०१/२०२४

प्रति,
उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB),
एमआयडीसी कॉलनी, तारापूर,
पालघर जिल्हा, महाराष्ट्र राज्य - ४०१५०४

विषय: पालघर जिल्ह्यात विनाशकारी प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार, शेतकरी, आदिवासी आदी भूमिपुत्र देशोधडीला लागणार असून पर्यावरणावर आणि पर्यावरणावर अवलंबून राहणाऱ्या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या जन सुनावणीच्या माध्यमातून सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहलावावर हरकती नोंदवून वाढवणं बंदर उभारणी कायमचे रद्द करण्याबाबत.....

संदर्भ: अर्जदार एकनाथ अनुड्या बारी यांचा अर्ज दि १८.०१.२०२४

आदरणीय महोदय,

आपण सादर केलेल्या हरकतींचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | एकनाथ अनुड्या बारी यांचा अर्ज दि १८.०१.२०२४ | हरकतींचा खुलासा |
|---|---|---|
| १. | राज्य सरकारने २६ टक्के भागीदारी हिस्सा VPPL कंपनीमधून काढून टाकण्यात यावा: सदर प्रकल्प केंद्र सरकारचे असल्याचे बोलले जात आहे परंतु सदर प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून संयुक्त उपक्रम राबवून वाढवणं पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL U45309MH2016GO1285869) हि कंपनी स्थापन करून ७४ टक्के हिस्सा जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकारण आणि २६ टक्के हिस्सा महाराष्ट्र मेरीटाईम | जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने वाढवण बंदराच्या विकासासाठी महाराष्ट्र सागरी मंडळासोबत सामंजस्य करार केंद्र शासनाच्या परवानगीने १३/०२/२०२० पत्राद्वारे एसपीव्हीच्या माध्यमातून करण्यात आला आहे की ज्यामधे मे. वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचा अनुक्रमे ७४% आणि २६% हिस्सा आहे. सदर कंपनी ची निर्मिती केंद्र शासनाच्या परवानगीने केली आहे व यास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेतली होती. या |

| | | |
|---|---|---|
| | बोर्डाचा आहे. पालघर येथील भूमिपुत्रांचा सदर बंदराला विरोध असल्याने भुमीपुत्रांना न्याय देण्याकरिता राज्य सरकारने सदर कंपनीमध्ये असलेल्या MMB चा हिस्सा काढून टाकावा जेणेकरून ह्या बंदराला कायमचा गुंडाळायला मदत होईल.<br>सदर कंपनीची रचना पब्लिक लिमिटेड म्हणून केल्याने ह्या कंपनीला खाजगी कंपन्यांना कौडीमोलात विकले जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे राज्य शासनाने आपला हिस्सा कडून ह्या कंपनीला गुंडाळल्यास हा प्रकल्प कायमचा रद्द होणार म्हणून विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रकल्पाला स्थानिकांकडून कडाडून विरोध असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या उपरोक्त विषयानुषंगे जन सुनावणीला मी हरकत नोंदवित असून प्रस्तावित वाढवण बंदर उभारणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी देऊ नये आणि ह्या बंदराला कायमचे रद्द करण्याची विनंती ह्या हरकती निवेदनाद्वारे करण्यात येत आहे, ह्याची नोद महोदयांनी घ्यावी, हि नम्र विनंती. | व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या परवानगीने व महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने जेएनपीए/एमएमबी यांचातील एमओयू व वीपीपीएल शेयरहोल्डिंग कराराची रचना करण्यात आली आहे.<br>अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाची मान्यता व केंद्र शासनाची परवानगी घेऊन वीपीपीएल ची निर्मिती केलेली आहे . |

हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर महत्वाचा असून मा. प्रधानमंत्री कार्यालयाच्या स्तरावर देखरेख ठेवली जात असल्याने या प्रकल्पाची शिफारस लवकरात लवकर पुढील मंजुरीसाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयकडे करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

हे पत्र अध्यक्ष (प्रभारी) यांच्या मान्यतेने जारी केले जाते.

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत
उप महाव्यवस्थापक (पयोवी)